म. ग्रं. सं. ठाणें

विषय
निबंध

ग्रहालय क्रमांक
८२
८६५

लेखक वांबेकर आणि
कु. वोसायरी

पुस्तकाचें नांव अगुणमज्जन

सन
१९६८

१३

सं. क्र.

अगुणमज्जन.

निबंध

म. ग्रं. मं. ठाणे
क्रमय
सं. नं. ५५११
सन- १८६८

...N-DEBT...

Bombay Tract and Book Society.
Maráthí 18mo Series. 2nd Edition.
5,000 Copies

BOMBAY

Printed at the "Oriental Press."

1868.

Price ¼ Anna किंमत पाव आणा

ON BEING IN DEBT.

ऋणमज्जन.

मनुष्यमात्राची वहिवाट जशी दुसऱ्या गोष्टी विषयीं बदलत असते, त्याप्रमाणेंच खर्चाविषयींहि बदलत असते. कित्येक लोक आपली सगळी प्राप्ति उधळून टाकितात, कित्येक तर तिजहून अधिक खर्च करितात, कित्येक तिजपेक्षां कमी खर्चतात. या तिघांतून जे आपल्या मिळकतीपेक्षां कमी खर्च करितात, ते कर्जापासून मोकळे राहतात. आणि द्रव्याविषयीं त्यांची वर्त्तणूक असी असल्यामुळें ते आपलें आयुष्य सुखांत शांतीने घालवितात. परं

तु जे लोक आपल्या आयापेक्षां खर्च ज्यास्त करि तात, ते लवकरच कर्जबाजारी होतात आणि अने क प्रकारच्या हाल अपेष्टेंस पडतात. जे कांहं संग्रह न करितां आपली सगळी प्राप्ति उधळितात त्यांस अकस्मात कांहीं विशेष खर्च करण्याचें कारण पडलें असतां मोठें संकट प्राप्त होतें, कारण ती गोष्ट शेवटास नेण्याकरितां ते कर्ज काढितात नंतर त्या कर्जामुळें अमर्याद दुःखांत बुडतात. परंतु जर कोणी मनुष्य कर्जबाजारी होण्याच्या वाईट प रिणामाविषयीं योग्य प्रकारें विचार करील तर तो निःसंशय कर्ज न काढण्याविषयीं किंवा कर्ज अस ल्यास त्यांतून मुक्त होण्याविषयीं जितका त्याच्यानें करवेल तितका प्रयत्न निश्चयपूर्वक लवकर करी ल, यांत संशय नाहीं.

कर्जबाजारी होण्याकडून काय परिणाम होतात हें समजावें असी कोणाची इच्छा असल्यास जें कांहीं एथें खालीं लिहिलें आहे तें लक्ष लावून वाचलें असतां सर्व कळून येईल.

कर्जभरू होण्याचे परिणाम.

पहिला परिणाम — दरिद्रीपणा.

जर रिणको मनुष्य कांहीं द्रव्य मिळवितो तर तें द्रव्य मुद्दलाचें व्याजच फेडण्यांत खर्च होऊन मुद्दल तसेंच कायम राहतें. याप्रमाणें हातांत पैसा नसल्यामुळें कोणत्याहि फायद्याच्या कामांत किंवा नफ्याचे व्यापारांत त्याच्याने हात घालवत नाहीं. शेवटीं तो आपलें सर्व आयुष्य दुसऱ्याच्या हाताकडे पहाण्यांत व कंगाल अवस्थेंत निरंतर घालवितो. जर तो कोणी एका दुकानदाराचा कर्जदार आहे तर तो दुकानदार जे जिन्नस त्यास उधार देतो त्याची दुप्पट किंमत त्याच्या डोक्यावर बसवितो. असें होता होतां थोडक्याच काळांत पुष्कळ देणें झाल्यामुळें विकत घेणाऱ्यास पुष्कळ संकटें प्राप्त होतात. जे लोक शेतकीचा व्यापार करून आपला निर्वाह करीत असतात ते कर्जबाजारी झाले ह्मणजे जमिनीची लागवड करण्याच्या श्रमाचा उपभोग त्यांच्या-

ने घेववत नाहीं. कारण शेतांत पीक होतांच सावकार येतो आणि तें पीक स्वस्त भावाने घेऊन जातो, आणि हा शेतकरी तसाच निर्धन होऊन बसतो. ह्मणून याचे सर्व कष्ट बहुधा व्यर्थ होतात.

दुसरा परिणाम—फजिति.

सावकार कर्जदारास बहुतकरून आपल्या दासाप्रमाणें लेखितो, तो याची फजिति, निंदा शिवीगाळ इत्यादि करण्यास चुकत नाहीं. तो यास कमपटाप्रमाणें लेखितो. कर्जबाजाऱ्यावर कोणी भरवसा ठेवीत नाहीं. व याला विपत्ति प्राप्त झाली असतां याला कोणी घटकाभर उसना देखील पैसा देत नाहीं. पवित्र शास्त्रामध्यें असें लिहिलें आहे कीं "दरिद्र्याचे सर्व भाऊ याला द्वेषितात, होय याचे मित्रहि यापासून दूर जातात, तो वचनें बोलत त्यांच्या पाठीस लागतो, परंतु ते अनुकूल होत नाहींत." नीति अ० १९, ओ० ७.

तिसरा परिणाम—भय.

सावकाराच्या भयामुळें कर्जदारास कधीं कधीं लपून राहाण्याचा प्रसंग प्राप्त होतो. कधीं कधीं त्याला आपलें घरदार, कुटुंब, मुलेंबाळें सोडून दुसऱ्या गांवीं पळून जावें लागतें. व पुढें तेथूनहि गांवोगांव भटकत फिरावें लागतें. आणि जर तो कदाचित् सांपडला तर त्याला तुरुंगांत घालितात. कित्येकांस तर आपलें कर्ज फेडण्याकरितां आपलें घरदार, मालमत्ता, जिनगी विकून फस्त करावी लागते. याप्रमाणें पुष्कळ लोक कर्जामुळें निरंतर भयामध्यें असतात. आणि सुख व निर्भयपणा यांचा उपभोग त्यांच्यानें कधीं घेववत नाहीं.

चवथा परिणाम—संकट.

कर्जदार मनुष्य आपली स्त्री व लेंकरेंबाळें यांस चार लोकांमध्यें प्रतिष्ठेनें ठेवूं शकत नाहीं म्हणून जसा चिंताक्रांत असतो त्याप्रमाणें त्याचें कुटुंबहि सर्वकाळ चिंताक्रांत असतें. यामुळें त्याच्या कुटुं-

वास फारसें सुख समाधान होत नसतें. नवरा असो किंवा बाप असो, पण जर तो कर्जबाजारी आहे तर त्याच्याने आपली बायको व लेंकरें यांसीं जसें वागावें ह्मणून योग्य आहे त्याप्रमाणें वागवत नाहीं. याप्रमाणें तो परमेश्वरासमोर दोषी असा ठरतो आणि तो जनामध्यें आणि विशेषेंकरून आपल्या कुटुंबामध्यें द्वेषास पात्र होतो.

पांचवा परिणाम—लबाडी.

जर कर्जदाराने मी कर्जदार आहें असें लोकांस कळविलें तर त्यास पैसा उसना देण्यास देखील कोणी त्याजवर भरंवसा ठेवीत नाहीं. या परिणामामुळें तो लोकांस फसविणारा होतो. आणि मी कोणाचा कर्जदार नाहीं असें लोकांस दाखवितो. तो सावकारास ह्मणतो कीं, महाराज, मी अमुक दिवशीं व्याज व अमुक दिवसीं मुद्दल यांचा फडशा करून देईन, परंतु जेव्हां जेव्हां ती मुदत भरते तेव्हां तो कांहींच फेड करीत नाहीं. याप्रमाणें

तो ठकविणारा व लबाड होतो. कपट व लबाडी हीं मोठीं पापें आहेत, असें सर्वांस ठाऊक आहे. विशेषेंकरून ज्यांस खऱ्या धर्माची माहिती झाली आहे त्यांस हें पक्कें ठाऊक आहे कीं, सर्व लबाड लोक सैतानाच्या घराण्यांतील आहेत. आणि पुढें परलोकीं ते सर्वकाळ नरकांतील यातना भोगतील.

साहावा परिणाम—चोरीचा दोष.

कित्येक कर्जदारांस आपलें कर्ज फेडण्यास आवडत नाहीं. आणि कित्येकांस तें फेडण्याची शक्ति नसते. कसेंहि असो, परंतु जर तो मनुष्य कर्ज वारीत नाहीं तर येणेंकरून निःसंशय सावकाराचा मोठा तोटा होऊन त्याचें कुटुंब फार अडचणींत पडतें आणि बोलण्यांत टाळाटाळ करण्याची वर्त्तणूक सावकारासीं चोरासारखी आहे. चोरी हें कर्म सर्वांच्या दृष्टींत मोठा दोष असें आहे. सरकाराने चोरासाठीं मोठी शिक्षा नेमून ठेविली आहे, आणि ज्या परमेश्वराने "तूं चोरी करूं नको" असी

आज्ञा दिली आहे, तो चोरास आकाशलोकीं राहाण्यास जागा देणार नाहीं.

सातवा परिणाम—कृपणपणा.

कर्जदारापासीं कांहीं द्रव्यसंचय होत नाहीं, जर कदाचित् त्याच्या हातीं कांहीं पैसा आला तर तो लागलाच मुद्दल किंवा व्याज फेडण्यांतच जातो आणि आपण पुनः रिक्तहस्त होऊन बसतो. त्याला कोणी गरीब मनुष्याचा फार कळवळा आला तरी त्याच्याने त्याला कांहीं देववत नाहीं. जर त्याने कांहीं दिलेंच तर त्यामुळे तो सरकारचा मोठा अन्यायी होतो आणि त्याची ती देणगी चोराच्या देणगीसारखी होते. याप्रमाणें कर्जदार कृपण होतो.

आठवा परिणाम—तारणाची उपेक्षा.

कर्जदाराचें मन शेताप्रमाणें आहे. आणि तें शेत क्लेश, भय, इत्यादि वाईट वृक्षांनी भरलें असतें,

ह्मणून तेथें पवित्र बीज वाढायास जागा मिळत नाहीं. आणि जर कदाचित् तें तेथें वाढूं लागलेंच तर सभोंवतील त्या सर्व वृक्षामुळें गुदमरलें जाऊन तें निष्फळच राहतें.

नववा परिणाम—लहानपणीं लग्न करण्याकडून दिवाळखोरी.

हिंदु लोकांत लहानपणीं लग्न करण्याची चाल फारच पसरली आहे. शेंकडों लोक मुलांचीं लग्नें लहानपणीं करून कर्जबाजारी होतात. जर मुलाचें वय बारावर्षांपेक्षां अधिक झालें तर मुलगी देणारा त्या मुलास आपली मुलगी देण्यास वचकतो; हा मुलगा इतका मोठा राहण्याचें कारण काय? यास कांहीं तरी खोड असावी, नाहीं तर याची गांवांत नापत झाली असावी. या भयामुळें मुलाचीं आईबापें आपला मुलगा आठ वर्षांचा झाला नाहीं तोंच तीं त्याचें लग्न करण्याची उतावळी करितात. ऋण फिटतें पण हीण फिटत नाहीं;

याकरितां कसेंहि असो, व कितीहि खर्च लागो, याचें लग्न लवकर केलें पाहिजे, असा पक्का निश्चय करून लग्नास आरंभ करितात.

आपली मुलगी श्रीमंताचे घरीं पडावी असी मुलीच्या आईबापांची फार इच्छा असते. ह्मणून तीं प्रथम शें दोनशें चारशें रुपये हुंडा देण्याचा करार करितात. मग तो हुंडा देण्याकरितां तीं दुहोत्र्या तिहोत्र्या व्याजाने सावकाराचें कर्ज काढितात, कर्ज न मिळालें तर घरदार विकून आर्धी व्याह्याची दाण भरितात मग लग्नास आरंभ.

अक्षतीच्या वेळेस बाहेर मिरवण्यासाठीं तासेमर्फे, हलक्या, बजंत्री, कोतवालघोडे, नक्के, हवया, चंद्रज्योती इत्यादि असल्याखेरीज मी अक्षतीस निघणारच नाहीं, असा हट्ट मुलीची आई किंवा मुलाची आई धरित. ह्मणून तिची हौस पुरविण्याकरितां शें दोनशें रुपये खर्चून हा वर सांगितलेला समारंभ करितात.

लग्नामध्यें विहिणीने ह्मणजे मुलाच्या आईने

रुसूं नये ह्मणून तिची मर्जी राखण्याकरितां जी हट्ट धरून जें जें मागेल तें तें देणें भाग पडतें; कारण जर इची मर्जी संभाळली नाहीं तर ही सासू माझी मुलगी मोठी होईपर्यंत तिचे फार हाल वनवास करील. आणि वायकांचें मागणेंहि अ-विचाराचें असतें. आपला लौकिक व्हावा ह्मणून शेंकडों रुपये ब्राह्मणांस दक्षिणा, रोज नाच, पंच पक्वान्नांची रोज रोज हजार दोन हजार पात्रांचीं जेवणें द्या असें मागते. आणि विहिणीचा हट्ट पुरवि-ण्यासाठीं त्यावेळीं मुलीचीं आईबापें मोठ्या पेचांत पडून सावकारापासून आढीची दिढी पत्करून कर्जी रुपये काढितात.

लग्नामध्यें माळी, साळी, वाणी, सराफ यांचें तर फार पिकतें. ते बारा आण्यांच्या मालाचा रुपया करितात, आणि मालकास तर तो त्या वेळेस जसें देईल तसें घेणें प्राप्त; नाहीं तर नुकसान होतें. असे लग्नामध्यें अणखी पुष्कळ अविचाराचे खर्च असतात, आणि पेचांत पडून त्यांस ते अवश्य करावे लागतात.

याप्रमाणें उधळपटी करून लग्नसमारंभ संपला ह्मणजे मग त्या वाण्याकडील खर्चाच्या दादी व मागतेकरी येऊं लागले, ह्मणजे त्यांस पाहून यांची छाती दडपून जाते; आणि दे माय, धरणी ठाय; असें होतें; मग तें ऋण लवकर फिटत नाहीं. असा उधळेपणा करण्याकडून या महाराष्ट्र देशांतील हजारों लोक भिकेस लागले व अजूनहि लागत आहेत. पाहा, लहानपणीं लग्न करण्याकडून कर्ज बाजारी होणें हें किती भयकारक आहे बरें!

हेंच लग्न मोठेपणीं केलें ह्मणजे आपली मुलगी मोठीच असते ह्मणून विहिणीपासून तिचे हाल होण्याचें भय नसतें; तिचे अविचारी व मूर्खपणाचे छंद पुरविण्याची गरज नाहीं. मुलगा मोठा होऊन तो स्वतः श्रमाने संपादन केलेल्या द्रव्यांत आपलें लग्न करायास तयार झाला ह्मणजे तो असा उधळेपणा करून सावकाराच्या ऋणांत कधींहि बुडणार नाहीं.

जे लग्नामध्यें दिवाळखोरी करून नांवलौकिक

मिळवितात व विलास सुखें भोगितात त्यांवर ईश्वराचा मोठा क्रोध होतो. त्याने आपणास जेवढें दिलें असेल त्यांत तृप्त असावें. कर्ज करून दान धर्म करणें; किंवा कीर्त्ति मिळविण्यासाठीं एखाद्या कामाबदल वर्गणीचा अकडा भरणें; या कृत्यांचा ईश्वरास मोठा कंटाळा येतो. जें काम करण्याची त्याने आह्मास शक्ति दिली नाहीं तें आपण कधींहि करूं नये हें उत्तम आहे.

दाहावा परिणाम—ईश्वराज्ञाभंग.

ईश्वराने सर्वांस ही आज्ञा दिली आहे कीं, "एकमेकांवर प्रीति करणें (याशिवाय) कोणाचे ऋणी होऊं नका." रोमकर अ० १६ ओ० ८.

या ईश्वरी आज्ञेवरून आपण असें समजावें कीं, जे लोक कर्ज करितात त्यांचा ईश्वराला फार कंटाळा येतो. तुह्मी आपल्या शेजाऱ्याचें कल्याण चिंतावें, त्याच्या संकटसमयीं त्याच्या गरजा पुरवाव्या, आणि आपणांकडून जितकें होईल तितकें त्याचें

साह्य करावें. परंतु तुह्मी द्रव्याविषयीं कोणाचे कर्जदार होऊं नका. आणि कर्ज काढण्याकडून आपल्या शेजाऱ्याचें वाईट करूं नका, किंवा त्यास संकटांत पाडूं नका. असें ईश्वर आह्मास आपल्या पवित्र शास्त्राकडून एथें शिकवितो.

जर आपण आपल्या शेजाऱ्यावर प्रीति न करून एथें सांगितल्याप्रमाणें आचरण न केलें, तर मग मात्र प्रीतीविषयीं त्याचे ऋणी होतों. ह्मणून हें प्रीतिरूप ऋण तुह्मी आपल्यावर वाढूं देऊं नका. आणि जर तुह्मास सावकार होण्याची इच्छा असेल तर तुह्मी आपल्या सर्व मनोभावाने आपल्या भावावर पूर्ण प्रीति करा ह्मणजे तुमच्या प्रीतिरूप धनाचें ओझें त्यावर होईल, व तुह्मी इहलोकीं व परलोकीं सुखी होऊन तुमचा आकाशांतील बाप जो प्रीतिरूप आहे त्याचे पुत्र व्हाल.

ऋणांतून मुक्त होण्याचा परिणाम.

कर्जदार होण्याच्या परिणामाविषयीं विचार के-

ला असतां जे ज्ञानी विचारशील आहेत ते कर्जापासून दूर राहण्याविषयीं प्रयत्न करतील अशी आशा आहे. यास्तव याप्रमाणें वागण्याविषयीं प्रयत्न करण्याची ज्यांची इच्छा आहे त्यांच्या हिताकरितां ज्या गोष्टींचें ज्ञान अवश्य असलें पाहिजे तें होण्याविषयीं हे पुढील उपाय सांगतों. या बोधाकडे सर्वांनी लक्ष लावावें अशी माझी प्रार्थना आहे.

पहिला उपाय— ईश्वरभक्ति.

जे लोक ईश्वराच्या भक्तीमध्यें तत्पर असतात, त्यांवर ईश्वर प्रीति करितो. आणि त्यांशीं तो बापाप्रमाणें वागतो. त्यांस तो ऐहिक व आत्मिक गोष्टी ज्यांची त्यांस गरज आहे त्या सर्व पुरवितो. आणखी तो त्यांच्या प्रार्थना ऐकून त्यांस उत्तर देतो. यास्तव जे त्याच्या आश्रयाखालीं आले आहेत त्यांनीं कर्जापासून दूर राहावें. "तुह्मी पाहिल्यानें देवाचें राज्य व त्याचें न्यायीपण मिळवायास

झटा, ह्मणजे तीहि सर्व तुह्मास मिळतील. अण खी या सर्वांची गरज तुह्मास आहे, हें तुमच्या आकाशांतील बापास ठाऊक आहे." मात्थी. अ० ६ ओ० ३२,३३.

ईश्वराने स्वत: असें ह्मटलें आहे कीं. "मी तुला सोडणार नाहीं व तुला कधींहि टाकणार नाहीं." इब्री अ० १३ ओ० ५. "अहो परमेश्वराचे पवित्रहो, त्याला भ्या; कां त्याच्या भय धरणाऱ्यांस उणें पडत नाहीं. सिंहास उणें पडेल व भूक लागेल, परंतु जे परमेश्वराला शोधितात त्यांस कांहीं उत्तमाची न्यूनता पडणार नाहीं." गीत ३४ ओ० ९,१०. "परमेश्वराचा आशीर्वाद धनवान करितो, आणि तो त्यासुद्धां कांहीं दु:ख लावीत नाहीं." नीति. अ० १० ओ० २२.

दुसरा उपाय—मेहनत.

आळसाने मनुष्याची संपत्ति उडून जाते. परंतु श्रम करण्याकडून सर्वप्रकारें नफा होईल. याविषयीं

प्रमाणें. "द्रव्य व्यर्थ आचरणाने उणें होतें; परंतु जो आपल्या जवळ संग्रह करितो तो वाढेल." नीति. अ० १३ ओ० ११. "आळस भारी झोंपेंत पाडितो व कामचोर उपाशी मरतो." अ० १९ ओ० १५." "आळसी जनाच्या शेताकडून व निर्बुद्धि मनुष्याच्या मळ्याकडून मी गेलों; तेव्हां पाहा, त्या सर्वांवर निदन रुतलें होतें, आणि कांट्यांच्या झाडांनी त्याची भूमि झांकली होती. आणि त्याचें दगडी कुसूं मोडलें होतें." अ० २४. ओ० ३०-३२ "आळशारे, मुंगीकडे जा, तिचे मार्ग पाहून शहाण हो. तिला कोणी नायक, मोकदम, किंवा अधिकारी नसतां ती उन्हाळ्यांत आपलें अन्न तयार करिते, व कापणीच्या समयीं आपलें खाणें गोळा करून ठेविते. अरे आळशा, कोठपर्यंत निजशील? आपल्या झोंपेंतून केव्हां उठशील? अणखी थोडीशी झोंप, अणखी थोड्याशा डुकल्या, अणखी निजायाला हात थोडेसे पोटाळावे, ह्मणजे तुझें क-

रिद्र वाटसरूसारिखें व तुझी गरिबी हत्यारबंद म नुष्यासारिखी येईल." अ० ६ ओ० ६.

तिसरा उपाय—परिमिताचरण.

दारूबाजाची संपत्ति दारू पिण्यांत उडविली जाते. आणि दारू पिऊन गुंग असल्यामुळें पैसा मिळविण्याचा सुप्रसंग निर्फळ जातो, यास्तव अशा लोकांस कर्जापासून दूर राहवत नाहीं.

जे विलासी लोक रुचिकर आणि मोलवान अन्न अनियमितपणानें खातात ते पुष्कळ द्रव्य उडवितात, आणि शरीरानें रोगी होतात, मग कर्ज केल्यावांचून त्यांच्यानें राहावत नाहीं. ऋण काढून सण करणें हें फार अयोग्य आहे.

जे इषकी असून आपलीं शरीरें सुंदर पोषाक आणि डागडागिने यांकडून शोभवितात ते लवकरच कर्जांत पडतात.

पुष्कळ लोक दुष्कर्मांस आपला पैसा व्यर्थ उधळीतात. कारण कीं कळवांतिणीच्या योगानें

अन्न मिळण्याची देखील मुष्कील पडते. हें सर्वांस ठाऊक आहे. यास्तव या दुष्कर्माविषयीं फार बारकाईने सांगण्याची गरज नाहीं.

चवथा उपाय— नम्रता.

जे गरीब लोक गर्विष्ठ आहेत ते आपल्या नीच अवस्थेविषयीं अतृप्त होऊन श्रीमंत मनुष्यासारिखें आपण वागावें असा प्रयत्न करितात. यामुळें प्राप्ति थोडी आणि खर्च फार असण्याच्या कारणाने ते लवकरच कर्जाच्या मार्गांत धांवतात. परंतु जे आपल्या गरिब अवस्थेंत तृप्त असून आपल्या प्राप्तीप्रमाणें बेताबाताचा खर्च करितात ते मात्र कर्जापासून दूर राहातात. पवित्र शास्त्रांत याविषयीं पुष्कळ वाक्यें आहेत; तीं येणेंप्रमाणें. "वर्त्तणूक निर्लोभ असावी; आपल्या जवळ आहे तेवढ्यानें तुह्मी तृप्त असावें." इब्री. अ० १३ ओ० ५. "मी (पौलस) कमतीविषयीं बोलतों असें नव्हे, कां तर मी ज्या अवस्थेंत आहें तींत तृप्त होण्यास

शिकलों. नीच होणें हें मला कळलें आणि आपणास पुष्कळ असावें हेंहि मला कळलें; तृप्त होण्यास व भुकेलाहि होण्यास, आणि समृद्ध होण्यास व उणा होण्यास, असें सर्वकाळ व अवस्थाविषयीं मी शिकलों आहें.” फिलिप्पैकरांस पत्र अ० ४ ओ० ११,१२ “आह्मी जगांत कांहीं आणिले नाहीं, आमच्यानें यांतून कांहीं नेवत नाहीं, हे उघडें आहे. तर आह्मास अन्न वस्त्र असल्यास आह्मी त्याकडून तृप्त असावें.” तीमथ्यसाला पाहिलें पत्र. अ० ६ ओ० ७,८.

पांचवा उपाय—मिथ्या मनोरथ न धरणें.

कोणी कोणी लोक मी या आपल्या हजार रुपयांवर पांचशें रुपये नफा मिळवीन असें मनांत आणून त्या कामांत ते व्यर्थ हात घालतात; शेवटीं “तेल गेलें तूप गेलें धुपाटणें हातीं आलें,” असी दुःखावस्था भोगितात. अशा या व्यर्थ लाभाच्या आशेनें शेंकडों सावकार व गोर गरीब लोक धुळीस

मिळाले आहेत. यास्तव जो व्यापार व जें काम वास्तविक योग्य नव्याचें असेल त्यांत योग्य रीतीनें खर्च करून आपलें द्रव्य राखावें. "द्रव्याचा लोभ सर्व वाइटांचें मूळ आहे; त्याची उत्कंठा धरून कित्येक विश्वासापासून बहकले आहेत, आणि त्यांनी आपणांस बहुत खेदांकडून भोसकून घेतलें आहे." तीमथ्यसाला पहिलें पत्र अ० ६ ओ० १०.

साहवा उपाय—ईर्षा न करणें.

पाहा, लाखों लोक ईर्षेच्या योगानें एकमेकांवर फिर्यादी करण्याकरितां लाखों रुपये खर्चून भडक्या मारीत फिरतात. आणि हातचें व पराचेंहि दवडून आपल्या घरादारावर नागर फिरवून हातीं नारळाची आई घेऊन दारोदार भिकेस लागले आहेत. केवढा हा अनर्थ! "भाऊ भावावर फियार्द करितो, तर आता तुह्मामध्येंही सर्व प्रकारें खोड आहे कीं, तुमचे एकमेकांसीं वाद होतात; त्यापेक्षा तुह्मी अन्याय कां सोसून घेत नाहीं? आणि

हानि कां सोसित नाहीं ?" १ करिंथकर अ ६ ओ० ६,७.

सातवा उपाय—रोजच्या खर्चाकडे लक्ष देणें.

आपल्या आयापेक्षां जे ज्यास्त खर्च करितात त्यांच्याने कर्जांतून मुक्त होववत नाहीं. आणि जे आपली सर्वच प्राप्ति खर्चितात तेहि कर्जांत पडतात. यास्तव आपल्या प्राप्तीचा कांहीं अंश सांठवून ठेवावा. आणि अगत्य पडल्यास तो खर्चांत जावा हें योग्य आहे. यासाठीं रोजच्या खर्चाकडे लक्ष पुरवावें हें फार अगत्याचें आहे. कारण जर प्रत्येक दिवशीं अविचाराने थोडें थोडें खर्चिलें तरी शेवटीं एकदम मोठा तोटा होऊन धक्का बसतो यास उदाहरण. एखाद्या नावेच्या तळास लहान भोंक पडलें तर थोडें थोडें पाणी आंत येऊन शेवटीं तें पाणी ती नाव बुडवून टाकितें, याप्रमाणें जो मनुष्य प्रतिदिवशीं थोडा थोडा व्यर्थ खर्च करितो तो शेवटीं कर्जामध्यें बुडून जातो. जसा लहान

उंदीर दाण्यांचें मोठें कोठार रोज रोज थोडथोडे दाणे खाऊन रिकामें करितो त्याप्रमाणें रोज थोडथोडें द्रव्य व्यर्थ खर्चिल्याने मनुष्यें भिकारी होतात. ज्या पदार्थाची आपल्यास गरज नाहीं तो कितीहि स्वस्त किमतीने घेतला तरी पैशाचा व्यर्थ खर्च होतो.

आठवा उपाय—परक्याच्या जामिनकीपासून दूर राहणें.

याविषयीं शास्त्रांतील प्रमाणें. "कोणी परक्याचा जामिन झाला तर हानि पावेल, परंतु जो टाळी देणाऱ्यांस अनुकूल होत नाहीं, तो निर्भय राहतो." नीति अ० ११ ओ० १५. "टाळी देणाऱ्यांतला किंवा ऋणासाठीं जे जामीन त्यातला तूं होऊं नको. फेडायाला जर तुझ्याजवळ कांहीं नाहीं, तर त्याने तुजखालून तुझें अंथरूण कां काढून घ्यावें ?" अ० २२ ओ० २६, २७.

जो कोणी या सदरहू विचाराप्रमाणें चालेल तो कर्जापासून अगदीं मोकळा राहील; परंतु अत्यंत संकटाच्या वेळीं त्याला किंचित् कर्ज काढण्याचें अगत्यच पडलें तर तें संकट निवारण झाल्यावर तो लवकरच त्या कर्जापासून मोकळा होईल.

ह्या जगांतील सावकारांपेक्षां मोठा असा दुसरा एक आत्मिक सावकार आहे. त्यानें आह्मास हात, पाय, तोंड, कान, डोळे इत्यादि शरीरसंबंधी अवयव दिले आहेत. तसेंच ज्ञान, इच्छा, आणि दुसरे मानसिक गुण दिले आहेत, आणि आमच्या आयुष्याचे दिवस हीहि त्याची मोठी देणगी आहे. तो ह्या आपल्या देणग्या आह्मापासून परत मागणार नाहीं आणि जरी कदाचित् मागितल्या तरी आमच्यानें त्या परत करवणार नाहींत. परंतु जसा कोणी सावकार फक्त व्याजच घेतो किंवा जसा राजा आपल्या जमिनी निरंतर देऊन प्रजेपासून प्रतिवर्षी सारा मात्र घेतो त्याप्रमाणें परमेश्वर आह्मापासून आपल्या देणगीचीं फळें ह्मणजे प्रीति,

ाजन आणि मान्यता जीं त्याचा हक्क असीं आहेत
ीं मात्र आह्मापासीं मागतो. जर आह्मी हें त्यास
ेत नाहीं तर त्याच्या दृष्टींत आह्मी कर्जदार
ोतों. यास्तव तें त्यास न देण्याकडून आम्ही
याच्या दृष्टींत एकटे कर्जबाजारी झालों कीं तें
कर्ज आमच्याने कधीं तिळमात्र देखील फेडवणार
नाहीं. आणि याकरितां त्या महान न्यायाचे
दिवशीं जेव्हां तो प्रत्येक मनुष्याचा हिशोब घेऊं
लागेल तेव्हां आह्मास कोणी सर्वोत्कृष्ट जामीन
असल्यावांचून आमची निभावणी होणार नाहीं.

हे प्रिय वाचणाऱ्या, प्रीति व भजन हें आह्मास ईश्वराचें देणें होतें. परंतु त्यांत आम्ही उणे पडलों, म्हणून प्रभू येशू ख्रीस्त या नांवाचा एक पुरुष आमचा जामीन झाला आणि त्याने तो आमच्या बद्दल भरून दिली. आतां मी त्याविषयीं थोडक्यांत सांगतों.

प्रभु येशू ख्रीस्त हा ऋणापासून मुक्त म्हणजे निष्पाप असा असून त्याने आम्हाकरितां आपलें रक्त

पाडिलें. तो सामान्य मनुष्य असता तर त्याच्या रक्ताचें मोल थोडेंच असतें. परंतु तो स्वतः ईश्वर होता, त्याने आम्हासाठीं आपलें प्राणार्पण केलें; त्याचें रक्त अमोल होतें म्हणून. जसें एका सूर्याच्या प्रकाशाकडून जगांतलि सर्व लोकांस उजेड प्राप्त होतो, तसें एका तारणाऱ्याने आपला प्राण देऊन सर्वांच्या पापरूप कर्जाची फेड केली. जो कोणीहि पापी मनुष्य प्रभु येशू खीस्ताचा अश्रय करितो त्याजवर ईश्वर प्रसन्न होऊन त्याला आज्ञा देतो. "त्याला खांचेंत उतरण्यापासून उद्धर. मला खंडणी मिळाली आहे." ईयोब, अ० ३३ ओ० २४. याप्रमाणें इहलोकीं तो पापी मनुष्य आनंद पावतो आणि परलोकीं अक्षय सुखाचा वतनदार होतो.

हे प्रिय वाचणाऱ्या, तूं या आयुष्यरूप दोरींत आहेस तोंपर्यंत ईश्वराशीं आपला समेट करून घे, नाहीं तर मरणकाल आला असतां तुला नरकरूप बंदीखान्यांत टाकतील. मग त्यांतून कधींहि तुझें निघणें

ोणार नाहीं. तुझ्या जीवांत जीव आहे तोंपर्यंत
ेशू ख्रीस्त जो जामीन त्याजवर विश्वास ठेव व
ाचे ठायीं आश्रय पाव. आह्मी सर्व मेंढरांप्रमाणें
ेडकलों आहों, व चुकून ज्या गोड लागल्या वाटा
्या भलभलत्या वाटा धरल्या. परंतु ईश्वराने हें
आमचें अपराधरूप कर्ज येशू ख्रीस्तावर घातलें आ-
णि त्यापासून भरून घेतलें, आतां तें पापरूप कर्ज
फिटलें आहे. कोंकऱ्याप्रमाणें जेव्हां त्याला वध-
्यासाठीं आणिलें तेव्हां त्याने आपलें मुख उघडिलें
नाहीं. जशी मेंढी आपल्या कातरणाऱ्यापुढें मुकी
असते तसें आपलें मुख न उघडतां त्याने संपूर्ण
जगाचीं पापें पुसून टाकण्याकरितां आपल्या जीवा-
चें बलिदान केलें. त्याच्या घायाकडून आह्मास
आरोग्य प्राप्त झालें. आणि त्याचें अमोल्य रक्त
आह्मास सर्व पापापासून शुद्ध करितें.